12-9-06 तरुण भारत



आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवल्याबद्दल ज्योती भाईगडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील. सोबत सौ. सुनिता काळे व प्रकाश कारंजकर व इतर.

# मॉरिशसमधील आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत ज्योती भाईगडेचे यश

**कोल्हापूर/ प्रतिनिधी■**

मॉरिशस येथे ३ सप्टेंबर रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय योगासन चॅम्पियन स्पर्धेत कमला कॉलेजची विद्यार्थिनी ज्योती भाईगडे हिने तिसरा क्रमांक मिळवला. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते तिचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या फिजीकल डायरेक्टर सौ. सुनिता काळे, प्रकाश कारंजकर आदी उपस्थित होते. तिला डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. बुधवारी १३ रोजी ज्योती भाईगडेचे योगासनाचे प्रात्यक्षिक कमला कॉलेज येथे होणार आहे.



कमला कॉलेजची विद्यार्थिनी कु. ज्योती भाईंगडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील. सोबत प्रकाश कारंजकर, डॉ. सौ. सुनिता काळे.

# ज्योती भाईंगडे हिचा कमला महाविद्यालयात सत्कार

**कोल्हापूर :** दुसऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन चॅम्पियनशिप २००६ स्पर्धेत कमला कॉलेजची विद्यार्थिनी ज्योती भाईंगडे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या निमित्ताने कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. दि इंटरनॅशनल योगा ट्रेनिंग ॲण्ड हिलिंग सेंटर यांच्या वतीने दि. ३ सप्टेंबर रोजी मॉरिशस येथे स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी प्रकाश कारंजकर फिजिकल डायरेक्टर डॉ. सौ. सुनिता काळे उपस्थित होत्या. तिला ताराराणी विद्यापीठाचे सचिव व कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. स्पर्धेकरिता तिला महाविद्यालयाकडून आर्थिक मदत मिळाली तसेच यापुढेही स्पर्धेसाठी मदत करण्यात येणार आहे. बुधवार दि. १३ रोजी दु. १२.३० वा. कमला कॉलेज येथे ज्योतीच्या योगासनाची प्रात्यक्षिके दाखवण्यात येणार आहेत.